


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे

वर्ष ५ । अंक १५८ । सोमवार ९ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322




## पैलवानावर गोळीबार करणारा आरोपी गावठी कट्ट्यासह जेरबंद

### पूर्ववैमनस्यातून जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केल्याची आरोपीची कबुली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड शहरात पैलवानावर गोळीबार करणा–या आरोपीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने गावठी कट्टा व जीवंत काडतुसासह जेरबंद केले आहे.

दिनांक ४ मार्च रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास तपनेश्वर रोड ते खाडेनगरकडे जाणा–या रोडवरील नुराणी कॉलनी या ठिकाणी अज्ञात आरोपींनी मोटारसायकलवर येऊन पैलवान सागर किसन मोहळकर याच्यावर गावठी कट्ट्यातून गोळीबार केला होता. याबाबत किसन चांगदेव मोहळकर (रा. जांबवाडी, ता. जामखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या ठिकाणी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, तसेच वैभव कलुबर्मे, किरणकुमार कबाडी यांनी भेट देऊन पाहणी केली होती. एसपींच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी सपोनि हरीश भोये, उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, अतुल लोटके, विष्णू भागवत, गणेश लोंढे, शाम जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, योगेश कर्डीले, अमृत आढाव, प्रशांत राठोड, प्रमोद जाधव, भगवान धुळे यांची दोन पथके तयार केली होती.


पथकाच्या तपासात ही घटना पूर्ववैमनस्यातून झाल्याचे पुढे आले. हा गुन्हा अभिमन्यु पोते (रा. जामखेड) व त्याच्या साथीदारांनी केला असल्याची व तो झिक्री (ता. जामखेड) गांवच्या शिवारामध्ये असल्याची माहिती प्राप्त झाली. पथकाने तात्काळ झिक्री शिवारातून अभिमन्यू महादेव पोते (वय २४ वर्षे, रा. भुतवडा रोड, लाईट बोर्डशेजारी, जामखेड) यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चार्ली उर्फ माऊली उर्फ ज्ञानेश्वर साठे, (पूर्ण नांव माहित नाही), रोहित विठ्ठल आखाडे ( दोघे रा. शास्त्रीनगर, कोथरुड पुणे), चिन्या (पूर्ण नांव माहित नाही, रा. कोथरुड पुणे) यांच्या साथीने गुन्हा केल्याची कबुली दिली. मागील वादाच्या कारणातून सागर मोहळकर यास जीवे मारण्याच्या उद्देशाने साथीदारांना जामखेड येथे बोलावले. मोहळकर याच्यावर पाळत ठेवून त्याची माहिती साथीदारांना दिली व त्यांनी त्यांच्याकडील गावठी कट्ट्यातून गोळीबार केल्याची माहिती आरोपीने चौकशीत पोलिसांकडे दिली आहे.

आरोपीकडून गावठी कट्टा व जीवंत काडतूस असा ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास जामखेड पोलीस करीत आहेत.

### अहिल्यानगर महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी

## भाजपचे सुभाष लोंढे बिनविरोध

### महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिपाली बारस्कर, उपसभापतीपदी भाजपच्या वर्षा सानप बिनविरोध



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या स्थायी समिती आणि महिला व बालकल्याण समितीच्या निवडणुका बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भारतीय जनता पक्षाकडून स्थायी समितीच्या सभापती पदासाठी यंदा नगरसेवक सुभाष लोंढे यांना संधी देण्यात आली आहे. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज नगरसचिवांकडे सादर केला. या पदासाठी केवळ सुभाष लोंढे यांचाच एकमेव अर्ज दाखल झाला आहे. त्यांच्या या उमेदवारी अर्जावर नगरसेवक मनोज कोतकर हे सूचक आहेत. त्यामुळे स्थायी समितीच्या सभापती पदावर सुभाष लोंढे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

दुसरीकडे, महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आणि उपसभापती पदासाठीची निवडणूकही बिनविरोध झाली आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदासाठी केवळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिपाली नितीन बारस्कर यांनीच आपले उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या या उमेदवारीला सुनीता किसन भिंगारदिवे यांनी सूचक म्हणून तर अनिता विपुल शेटिया यांनी अनुमोदक म्हणून पाठिंबा दिला आहे.

तसेच, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती पदासाठी भाजपच्या वर्षा रोहन सानप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उपसभापती पदाच्या त्यांच्या या अर्जावर वंदना विलास ताठे या सूचक आणि रोशनी आकाश त्र्यंबके या अनुमोदक आहेत. या दोन्ही पदांसाठीही अन्य कोणतेही अर्ज न आल्याने या निवडीदेखील बिनविरोध होणार आहेत. स्थायी समितीचे सभापती तसेच महिला व बालकल्याण समितीचे सभापती आणि उपसभापती या तिन्ही महत्त्वाच्या पदांसाठी केवळ एकेकच अर्ज दाखल झाल्याने या सर्व निवडी बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता केवळ औपचारिकतेचा भाग शिल्लक असून, उद्या होणाऱ्या महापालिकेच्या विशेष सभेत आवश्यक ती कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया राबवून या सर्व बिनविरोध निवडींची अधिकृत घोषणा केली जाणार आहे.

### अहिल्यानगरात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

## १४ वर्षांच्या मुलींना मोफत लस

### गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लढा : मनपाकडून एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू । महिला दिनानिमित्त एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात; ३९१५ मुली लाभार्थी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या हस्ते एचपीव्ही () लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात येणार असून राज्यातील सर्व जिल्हे, महानगरपालिका व संबंधित आरोग्य संस्थांमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

एचपीव्ही लसीकरणाचा मुख्य उद्देश गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध करणे हा आहे. एचपीव्हीशी संबंधित सर्व कर्करोगांपैकी सुमारे ८२ टक्के कर्करोग गर्भाशय मुखाशी संबंधित असल्याचे मानले जाते. मुलींचे लैंगिकदृष्ट्या सक्रिय होण्यापूर्वी लसीकरण केल्यास गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध प्रभावीपणे करता येतो. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे पुढील १०० वर्षांत सुमारे ६ कोटी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची प्रकरणे आणि सुमारे ४.५ कोटी मृत्यू टाळता येऊ शकतात, असा अंदाज आहे.

एचपीव्ही लस (विषाणू–सदृश कण ) शरीरात दिल्यानंतर रोगप्रतिकारक शक्तीला उत्तेजित करते. त्यामुळे शरीरात अँटीबॉडीज तयार होतात आणि भविष्यातील संसर्गापासून संरक्षण मिळते. भारत सरकारच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १४ वर्षे वयोगटातील मुली (ज्यांनी १४ वा वाढदिवस साजरा केला आहे पण १५ वा वाढदिवस अद्याप झालेला नाही) या एचपीव्ही लसीसाठी पात्र आहेत.

अहिल्यानगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांसाठी दि. ११ मार्च २०२६ पासून तीन महिन्यांच्या कालावधीत ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये गार्डासिल ही लस पात्र लाभार्थ्यांना मोफत देण्यात येणार आहे.

सदर मोहिम यशस्वी करण्यासाठी दि. ६ मार्च २०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका स्तरावर कृतीदलाची बैठक घेण्यात आली. या बैठकीस डॉ. सतीश राजूरकर (निमा संघटना), संघटनेचे अध्यक्ष, संघटनेचे अध्यक्ष, मनपा शिक्षण अधिकारी, सर्व नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण ३९१५ पात्र लाभार्थी असून महानगरपालिकेच्या ७ नागरी आरोग्य केंद्रांवर सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत लसीकरण सत्र आयोजित करण्यात येणार आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांची शासनाच्या पोर्टलवर नोंदणी केली जाणार असून त्यासाठी आधार कार्ड अनिवार्य आहे.

त्यामुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व १४ वर्षे वयोगटातील पात्र मुलींनी जवळच्या नागरी आरोग्य केंद्रात जाऊन एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

## कार्यालय नगर परिषद, पैठण

Email : munptn@gmali.com दूरध्वनी नंबर – ०२४३१–२२३०१० जा. क्र. नपपै/यात्रा/कावि/२०२६/४७७

## जाहीर आवाहन

पैठण शहरातील सर्व नागरिकांना व यात्रेकरूंना सूचित केले जाते की, यात्रेच्या काळात ताप, सर्दी, खोकल्याचा संसर्ग होऊ नये म्हणून खालील दक्षता व उपाययोजना करावी. रोगाचा प्रसार व संसर्ग होणार नाही, यासाठी सहकार्य करावे.

◆ तापेचा साथीचा उगम हा घरोघर साठवलेल्या पाण्याच्या माध्यमाने होत असतो. त्याकरिता दीर्घकाळातील साठवलेले पाणी काढून टाकावे व पाण्याचा हौद स्वच्छ करून घ्यावा. पाणी गाळून व उकळून प्यावे. ◆ यात्रेकरूंनी व पैठण शहरातील दुकानदारांनी नगर परिषदेची परवानगी घेऊनच दुकाने लावावीत. ◆ विक्रेत्यांनी विक्रीच्या ठिकाणी शिळे, उघडे अन्न व सडलेला भाजीपाला, फळे विक्रीसाठी ठेवू नयेत. अन्न पदार्थ झाकून ठेवावेत. ◆ गोदावरी नदीत पोहण्यास सक्त मनाई आहे. ◆ गोदावरी नदीच्या पात्रात पाण्यासाठी खड्डे व झरे करून पाणी पिण्यासाठी वापरू नये. ◆ हॉटेलधारकांनी पिण्याचे पाणी साठविण्याचे हौद, रांजण, माठ इत्यादी दररोज स्वच्छ धुऊन घ्यावेत. ◆ दुकानदारांनी केरकचरा, घाण रस्त्यावर टाकू नये. आपला परिसर स्वच्छ ठेवावा. ◆ नागरिकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा व पाण्याचे डबके तयार होऊ देऊ नयेत, साचलेले पाणी काढून टाकावे व जंतुनाशक औषधाचा वापर करावा. ◆ शहर स्वच्छतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे. ◆ पाण्याचा अपव्यय टाळावा. ◆ पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा. ◆ सार्वजनिक रस्ते, खुल्या जागा इत्यादी परिसर अस्वच्छ करू नये. ◆ नाल्यामध्ये केरकचरा टाकू नये. ◆ जनावर धारकांनी आपआपली जनावरे मोकाट फिरणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. ◆ आरोग्याच्या दृष्टिकोनातून काही माहिती, मदत किंवा मार्गदर्शन हवे असल्यास पैठण ग्रामीण (सरकारी रुग्णालय) विभागाशी संपर्क साधावा.

### नाथषष्ठीनिमित्त पैठण नगरीत येणाऱ्या सर्व वारकऱ्यांचे स्वागत!



सौ. विद्या भूषण कावसानकर
नगराध्यक्षा, नगर परिषद, पैठण

श्री. तुषार सूर्यभान पाटील
उपाध्यक्ष, नगर परिषद, पैठण

डॉ. पल्लवी अंभोरे
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण

सर्व नगर परिषद सदस्य व कर्मचारी वृंद,
नगर परिषद, पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर

## दै. आकर्षण निवडक

### ट्रॅक्टर अपघातात तरुणीचा मृत्यू; चालकाला दीड वर्ष सक्तमजुरी व ५१ हजारांचा दंड



कोपरगाव - कोपरगाव तालुक्यातील तिळवणी येथील उपबाजारात कांदे भरत असताना झालेल्या ट्रॅक्टर अपघातात तरुणीचा मृत्यू झाल्याप्रकरणी चालकाला न्यायालयाने विविध कलमांतर्गत २ वर्ष तुरुंगवास आणि ५१ हजार दंड अशी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाची सुनावणी कोपरगाव येथील न्यायालयात होऊन आरोपी बाबासाहेब वाल्मिक शिंदे यास दोषी ठरवत अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी संजय खैरनार यांनी ही शिक्षा सुनावली. दिनांक १५ मार्च २०२२ रोजी तिळवणी येथील उपबाजारात कांदे भरत असताना ट्रॅक्टर चालक बाबासाहेब वाल्मिक शिंदे याने निष्काळजीपणे वाहन चालविल्याने झालेल्या अपघातात कु. संगीता पगारे (वय २४) हिचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणाची सुनावणी कोपरगाव न्यायालयात झाली असता फिर्यादी पक्ष मयत तरुणीच्या वतीने सरकारी वकील प्रदीप रणधीर यांनी जोरदार युक्तिवाद केला. तर आरोपीच्या बाजूने बचाव पक्षाच्या वकिलांनी बाजू मांडली. साक्षीदारांची साक्ष आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून माननीय न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपी बाबासाहेब शिंदे यास भारतीय दंड संहिता कलम ३०४-अ अंतर्गत १८ महिने सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच कलम २७९ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत ६ महिने सक्तमजुरी व १ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली असल्याची माहिती फिर्यादी पक्षाचे वकील एडवोकेट प्रदीप रणधीर यांनी दिली आहे.

### महिला दिनानिमित्त महाराष्ट्रात दारूबंदीची मागणी

अहिल्यानगर- समाजातील वाढत्या व्यसनाधिनतेमुळे कुटुंबांमध्ये आर्थिक, मानसिक व सामाजिक तणाव वाढत असून त्याचा सर्वाधिक फटका महिलांना व मुलांच्या भवितव्याला बसत आहे. या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड तथा गुरुदेव सेवक भाऊसाहेब सावळाराम बऱ्हाटे यांनी महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रात दारूबंदी लागू करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मेल करून निवेदनाद्वारे मागणी केली आहे. बऱ्हाटे म्हणाले की, कुटुंबातील कर्ता पुरुष व्यसनाधीन झाल्यास त्या कुटुंबावर आर्थिक व मानसिक तणाव निर्माण होतो. त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि संस्कारांवर होऊन अनेक कुटुंबांचे शांततामय जीवन विस्कळीत होत असल्याचे वास्तव समाजात दिसून येत आहे.

### कै.चंद्रभान गाडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन

अहिल्यानगर- कै.चंद्रभान नारायण गाडेकर यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे.मृत्यु समयी त्यांचे वय ९५ वर्षे होते.ते अत्यंत धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते.त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात मुलगा,सून,नातू,नात सुन, पणतु असा परीवार आहे.ॲड. सुभाष गाडेकर याचे ते वडील होते.



# शिवजयंतीनिमीत्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**शिवाजी महाराजांचे आदर्श जीवन, धैर्य, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम यांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा - साधना कुकडे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथील सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवरायांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा बोर्डे, केशवराव हायस्कूलचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, उपक्रमशील शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या साधना कुकडे, मनीषा चौरे, कांचन मिरपगार, किरणताई बारस्कर, जयश्री लांडे, मनीषा हिवाळे आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या साधना कुकडे यांच्या पुढाकारातून प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. परीक्षेसाठी शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

मुख्याध्यापिका मनीषा बोर्डे आपल्या मनोगतात म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्याच्या संकल्पनेतून आजच्या पिढीने प्रेरणा घेणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी शिवरायांचे आदर्श समोर ठेवून प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन समाजासाठी कार्य करण्याचे त्यांनी आवाहन केले.

सामाजिक कार्यकर्त्या साधना कुकडे म्हणाल्या की, शिवाजी महाराजांनी न्याय, स्वाभिमान आणि स्वराज्य यांचे महान विचार समाजाला दिले. त्यांच्या कार्यातून समाजसेवेची प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावण्याचा आमचा छोटासा प्रयत्न आहे. शिवाजी महाराजांचे आदर्श जीवन, धैर्य, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम यांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपस्थित शिक्षकांनीही शिवरायांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या पराक्रमाची व स्वराज्य स्थापनेच्या इतिहासाची माहिती दिली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जयघोषाने वातावरण भारावून टाकले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो – महापौर ज्योतीताई गाडे

**जीनियस ग्लोबल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात**
**चिमुकल्यांच्या नृत्य–गीतांच्या बहारदार सादरीकरणाने पालक मंत्रमुग्ध**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भिस्तबाग, कजबे मळा येथील जीनियस ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात व जल्लोषात पार पडले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, देशभक्तीपर गीते, समूह नृत्य, अभिनय आणि विविध कलागुणांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका सौ. शारदाताई ढवण, जीनियस ग्लोबल स्कूलचे अध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, इंजिनिअर डी. आर. शेंडगे, सेक्रेटरी पूजाताई कजबे, उपाध्यक्ष सानप, खजिनदार पांडुरंग गवळी, बाळासाहेब कजबे, राहुल कजबे, अश्विनी शेंडगे, उषा शेंडगे, शांताराम कजबे, सहसंचालक जगदीश देशमुख तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी आणि शहरातील विविध प्री–प्रायमरी स्कूलचे संचालक उपस्थित होते.

संस्थेचे सहसंचालक महेंद्र म्हसे यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविकात संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने शिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे तर क्रीडा, कला, संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास यावरही विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेचे सहसंचालक जगदीश देशमुख यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने व क्रीडा शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण दिले जात असल्याची माहिती दिली.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करताना अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले.

# होळीचे दहन म्हणजे अज्ञान, अहंकार आणि अंधश्रद्धेची होळी – ह.भ.प. शितलताई साबळे महाराज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथे जगद्गुरु तुकोबाराय प्रतिष्ठानच्या वतीने जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीजे निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात दररोज विविध कीर्तनकारांची कीर्तन सेवा पार पडत आहे. या सप्ताहाच्या चौथ्या दिवशी ह.भ.प. शितलताई साबळे महाराज यांनी आपल्या प्रभावी कीर्तनातून अध्यात्मिक विचार मांडत उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले.

कीर्तनामध्ये संत तुकाराम महाराजांच्या ''देव जाणता देव जाणता आपुलिया सत्ता एकाएकी देव चतुर देव चतुर जाणोनिअंतर वर्ततसे देव निराळा देव निराळा अलिप्त विटाळा तुका म्हणे '' या अभंगाच्या ओवीवर त्यांनी सखोल विवेचन केले. देव स्वतः ज्ञानरूप असून तो सर्वांच्या अंत:करणात वास करतो. देव सर्व काही जाणणारा आहे, त्यामुळे माणसाने सदाचाराने वागणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आई–वडिलांची सेवा करावी आणि मुलींवर चांगले संस्कार करावेत. मुलींनी आपल्या घराला आणि संस्कृतीला शोभेल असेच आचरण करावे. महाराष्ट्राच्या पवित्र मायभूमीत छत्रपती शिवाजी महाराज होते म्हणून आजही आपल्या मंदिरांची परंपरा आणि धार्मिक–सामाजिक उपक्रम जिवंत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या बीजे निमित्त सावेडीत भव्य दिंडी सोहळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी गावामध्ये माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या माध्यमातून गेल्या सत्तावीस वर्षांपासून जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीजे उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. हा सोहळा दरवर्षी मोठ्या धार्मिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत असून यावर्षीही सावेडी गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

या निमित्ताने सावेडी गावात भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दिंडी सोहळ्यात टाळ–मृदुंगाच्या गजरात संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते. ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'' च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. गावातील महिला–पुरुष, युवक–युवती तसेच लहान मुले मोठ्या उत्साहाने या दिंडीमध्ये सहभागी झाले होते.

दिंडी मार्गावर गावातील महिलांनी ठिकठिकाणी सडा–रांगोळी काढून दिंडीचे स्वागत केले. रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजलेले रस्ते आणि भक्तिरसात रंगलेले वारकरी हे दृश्य सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. महिला डोक्यावर कलश घेऊन मिरवणुकीमध्ये सहभागी झाल्या होत्या.

यावेळी बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा विशेष आकर्षण ठरला. लहान मुला–मुलींनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान करून दिंडीमध्ये सहभाग घेतला. त्यांच्या निरागस आणि भक्तिमय सहभागामुळे उपस्थित नागरिक भारावून गेले. बाल वारकऱ्यांनी सादर केलेला रिंगण सोहळा नेत्रदीपक ठरला.

दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून गावामध्ये आध्यात्मिकतेचा आणि संस्कृतीचा वारसा जपण्याचे कार्य केले जाते. या मिरवणुकीत ज्येष्ठ महिला–पुरुष मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. काही ठिकाणी महिलांनी फुगडी खेळत भक्तीमय वातावरणात आनंद व्यक्त केला.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे आणि सरला वाकळे यांनीही दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होत भक्तांसोबत नाचत उत्सवाचा आनंद घेतला.

# महिला दिनानिमित्त मोफत स्तन व गर्भपिशवी कर्करोग तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने पद्मशाली स्नेहिमा संघम आणि निमा वुमन्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्यासाठी स्तनाचा व गर्भपिशवीचा कर्करोग याबाबत मोफत तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात महिलांची तपासणी करून स्तनाचा तसेच गर्भपिशवीचा कर्करोग टाळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

अलिकडच्या काळात महिलांमध्ये स्तनाचा व गर्भपिशवीचा कर्करोगाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या गंभीर आजाराबाबत महिलांमध्ये जागृती निर्माण व्हावी आणि वेळेवर तपासणी करून रोगाचे लवकर निदान व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात पद्मशाली स्नेहिमा संघमच्या अध्यक्षा डॉ. रत्नाताई बल्लाळ, डॉ. अंशू मुळे आणि डॉ. मानसी कांबळे यांनी कर्करोगाची कारणे, लक्षणे, त्यावरील उपचार तसेच वेळेवर निदानाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून नियमित तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. कांचन रच्चा यांनी गर्भपिशवीचा कर्करोग टाळण्यासाठी दिली जाणारी एचपीव्ही व्हॅक्सिन () लस, तिचे डोस आणि वयानुसार ती कशी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती दिली. कर्करोग पहिल्या टप्प्यात ओळखला गेला तर तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, असे सांगत त्यांनी स्त्रियांनी स्वतः स्तनाची तपासणी कशी करावी याचे प्रात्यक्षिकही दाखवून दिले. तसेच शिबिरात उपस्थित सर्व महिलांची गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी करण्यात आली.या शिबिरात डॉ. अंशू मुळे, डॉ. मानसी कांबळे, डॉ. कांचन रच्चा, डॉ. रत्ना बल्लाळ, डॉ. प्रेरणा छिंदम, डॉ. प्रांजल आडेप आणि डॉ. प्रीती सुरकुटला यांनी महिलांची तपासणी केली.

जवळपास शंभरहून अधिक महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी पद्मशाली स्नेहिमा संघमच्या उपाध्यक्षा रेखा वडेपल्ली, सचिव सपना छिंदम यांच्यासह पुनम वन्नम, साधना कोळपेक, नीता बुरा, विजया गुंडू, प्रमिला वन्नम, सविता एक्कलदेवी, आरती छिंदम, सरोजा गुडा, रोहिणी पागा, कांचन कुंटला, कल्पना बुलबुले, सविता कोठारी, रेखा गरुड, ऐश्वर्या अंकाराम, सविता येनगुंदुल, निर्मला गुंडू, सरू रच्चा, लक्ष्मी गुंडू, प्रमिला चिल्का आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# डॉ.पाऊलबुधे कॉलेज मध्ये राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिनानिमित्त 'फार्मअन्वेषण २०२६' कार्यक्रम संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्या नगर मधील वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे.पाऊल बुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथे ६ मार्च २०२६ रोजी ''राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन'' उत्साहात साजरा करण्यात आला. भारतातील फार्मसी शिक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाणारे प्रा.एम. एल.श्रॉफ यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो.

या निमित्ताने महाविद्यालयात ''फार्मअन्वेषण २०२६'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना अशी होती. या कार्यक्रमाचा उद्देश फार्मसी शिक्षण, संशोधन, उद्योग आणि नियामक क्षेत्र यांच्यातील समन्वय वाढवून भविष्यातील फार्मा क्षेत्राच्या विकासाला चालना देणे हा होता.

हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमामध्ये प्रा.एम.एल. श्रॉफ यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांना फार्मसी शिक्षणाचे महत्त्व तसेच फार्मा क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी बी फॉर्मसी चे प्राचार्य डॉ.श्याम पांगा–डी.फार्मसी चे प्राचार्या अनुराधा चव्हाण,विविध विभागप्रमुख, डॉ. वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी,डॉ. प्रसाद घुगरकर, सौ.स्वाती कडनोर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे व्यवस्थापन, सर्व प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग घेतला. उपस्थित विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमाचे संस्थेच्या सर्व पदाधिकारी संचालक मंडळांनी कौतुक केले.

# आयएमएसच्या विद्यार्थ्यांची गुजराथ एमआयडीसीला शैक्षणिक भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर येथील भा.पा.हिवाळे संस्थेच्या आय एम एस या व्यवस्थापन संस्थेतील एमबीए च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल गुजरात मधील सिल्वासा या ठिकाणी जाऊन आली. येथील एमआयडीसी मधील पारले अग्रो , अक्षय किचन, मिन टॉईज या उद्योगांना विद्यार्थ्यांनी भेट दिली तीनही ठिकाणी विद्यार्थ्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

व्यवस्थापनातील बारकावे, विपणन, वित्त, मानव संसाधन, वाहतूक, अशा अनेक विभागांची माहिती शिकायला मिळाली. क्लास मधील शिक्षण व प्रात्यक्षिक ज्ञान यामुळे मुलांच्या मनात असलेली व्यापार क्षेत्रातील प्रतिमा यांचा योग्य मिलाप होतो. त्यातून विद्यार्थी अधिकच चांगल्या पद्धतीने परीक्षेला तसेच मुलाखतीला सामोरे जाऊ शकतो याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो.

या सहलीसाठी संस्थेला वंडर ट्रिप प्रा.ली या कंपनीने सहकार्य केले. तीन दिवसाच्या या सहलीत मुलांची राहण्याची, खाण्याची सर्व व्यवस्था उत्तम करण्यात आली होती. सहलीसाठी आकारण्यात आलेली माफक फी ज्यामध्ये संस्थेने देखील काही भार उचलला. यामुळे अधिकाधिक मुलांनी या संधीचा फायदा घेतला.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ⁕संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### डोंगरातील श्री गोरक्षनाथ मंदिर विद्युत रोषणाईने उजळले

अहिल्यानगर - तालुक्यातील आदर्श गाव



मांजरसुंबा येथील डोंगरमाथ्यावर वसलेले श्री क्षेत्र गोरक्षनाथ मंदिर सध्या आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. मंदिराच्या कलशरोहण सोहळ्यानिमित्त संपूर्ण गोरक्षनाथ गड परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. डोंगरमाथ्यावर असलेल्या या पवित्र मंदिरावर करण्यात आलेली रंगीबेरंगी विद्युत रोषणाई रात्रीच्या वेळी अत्यंत मनमोहक आणि आकर्षक दिसत आहे. मंदिर परिसरातील रोषणाई, सजावट आणि धार्मिक वातावरण पाहण्यासाठी दररोज सायंकाळी अनेक भाविक गडावर येत आहेत. या सुंदर रोषणाईमुळे गोरक्षनाथ गडाचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे नाथसंप्रदायातील अत्यंत पवित्र आणि श्रद्धास्थान असलेले धार्मिक स्थान म्हणून ओळखले जाते. संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीवर राज्याच्या विविध भागातून नाथभक्त आणि वारकरी भाविक मोठ्या संख्येने देवदर्शनासाठी येत आहेत. मंदिराच्या कलशरोहण धार्मिक सोहळ्यामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. या निमित्ताने गड परिसरात विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भक्तांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळत आहे. डोंगरमाथ्यावरून दिसणारी रोषणाई आणि मंदिराचे दिव्य स्वरूप पाहताना भाविकांना जणू काही स्वर्गीय वातावरणाचा अनुभव मिळत असल्याची भावना अनेक भक्तांनी व्यक्त केली. त्यामुळे दररोज सायंकाळी मोठ्या संख्येने भाविक गोरक्षनाथ गडावर येऊन दर्शन घेत आहेत.कलशरोहण सोहळ्याचा ऐतिहासिक क्षण प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य भाविकांना लाभणार असून या पवित्र सोहळ्यात सहभागी होताना भक्तांना धार्मिकता, अध्यात्म आणि भक्तीचा आनंद मिळणार आहे.

### सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब रामभाऊ शिंदे यांना बालाघाटमध्ये मानद डॉक्टरेट प्रदान

अहिल्यानगर - येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब रामभाऊ शिंदे यांना इतिहास व पुरातत्त्व संशोधन संस्थान आणि वीर अकादमी, बालाघाट (मध्यप्रदेश) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय साहित्य व पुरातत्त्वाच्या २४व्या अधिवेशनात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून गौरविण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, आरोग्य तसेच अ‍ॅन्टी रॅगिंग मिशनमधील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. पुण्यसलिला वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेल्या बालाघाट शहरात हा भव्य सोहळा उत्साहात पार पडला. देशातील तब्बल १५ राज्यांमधील नामवंत पुरातत्त्ववेत्ते, इतिहासकार, साहित्यिक, समाजशास्त्रज्ञ, अधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. मुंबई (महाराष्ट्र) येथील डॉ. फिरदोस शरीफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. विद्रसिंह गहरवार, डॉ. कुलदीप बिल्थरे, डॉ. जगदीशचंद्र वर्मा, डॉ. कविता गहरवार आदी मान्यवरांच्या हस्ते बाबासाहेब शिंदे यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. बाबासाहेब रामभाऊ शिंदे हे बापूराव जानकोजी शिंदे (सरकार) या राजघराण्याचे वंशज असून त्यांनी अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांतून समाजसेवेचा ध्यास घेतला आहे. ग्रामीण भागातील विकासकामांना चालना देण्यासाठी त्यांनी रोजगारनिर्मिती कार्यक्रम आयोजित केले. गावागावातील नागरिकांना एकत्र करून विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी ‘राजमाता मानव्य सेवाभावी संस्था’ या माध्यमातून विविध उपक्रम सुरू केले. या संस्थेद्वारे महिलांना आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन व स्वावलंबनासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात आले. भारतीय आयुर्वेदाच्या संवर्धनासाठी आणि जनजागृतीसाठी बाबासाहेब शिंदे यांनी ‘यशवंतराजे भारतीय आयुर्वेद संगोपन’ अभियानांतर्गत देशभर बाईक रॅली काढली. या अभियानादरम्यान त्यांनी अनेक गावांमध्ये ग्रामसभा घेऊन नागरिकांना आयुर्वेद, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

# महिलांचा सन्मान हा एक दिवस नव्हे तर ३६५ दिवस व्हावे - मा. नगरसेविका सौ. वीणा बोज्ज्ञा

## बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम प्री स्कुलमध्ये महिला दिन साजरा




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प. पु. माताजी श्री निर्मला देवी प्रणित विश्व निर्मल फौंडेशन संचलित किड्स सेकंड होम प्री स्कुल मध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला या वेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मा. नगरसेविका सौ. विनाताई बोज्जा आणि आरोग्य विभागातील सौ. जयश्री सामलेटी म्हणून उपस्थित होत्या.

या वेळी बोलतांना वीणा बोज्जा म्हणाले आज जागतिक महिला दिन आहे सम्पूर्ण जगात आज महिला दिन म्हणून साजरा करतात परंतु महिला दिन एक दिवस साजरा करून उपयोग नाही तर ३६५ दिवस महिला दिन म्हणून साजरा करावा, महिले शिवाय कोणतेही कार्य होत नाही परंतु आज काल महिला अत्याचार मोठया प्रमाणात वाढले आहेत या साठी सरकारने हे अत्याचार होऊ नेये म्हणून ठोस पाऊले उचलावीत अशी मागणी केली.

या वेळी महिला दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या महिला पालकांना आमंत्रित करून होम मिनिस्टर कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये पहिला क्रमांक सौ. भारती कदम, दुसरा क्रमांक सौ. अश्विनी भापासे व तिसरा क्रमांक सौ. सविता खाडे यांनी मिळवला. या कार्यक्रमात अनेक महिलांनी आपले मनोगत सादर करून महिला दीना निमित्त आनंद उत्सव साजरा केला.

कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचे हस्ते प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांचे प्रतिमेस हार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अर्चना भाटे व सौ. दिपाली हजारे यांनी केलेतर आभार शाळेच्या मुख्याधपिका सौ. संगीता गांगर्डे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी शिक्षिका सौ. अर्चना चव्हाण, सौ. सीमा सोनावणे, सौ. पूजा शिरसाठ, सौ. लीना काळे, सौ. नीलम पवार यांनी परीश्रम घेतले. या कार्यक्रमास महिला पालक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# नाथषष्ठी निमित्त पैठणमध्ये दिंड्यांचे उत्स्फूर्त स्वागत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** नाथषष्ठी सोहळा निमित्त पैठण येथे राज्याच्या विविध भागांतून पायी चालत येणाऱ्या दिंड्यांचे पैठण नगरपरिषदेच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शहरात दाखल झालेल्या वारकरी व भाविकांवर पुष्पवृष्टी करून तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून त्यांचे स्वागत करण्यात आले. नाथषष्ठी सोहळ्यासाठी हजारो भाविक पैठणमध्ये दाखल होत असून शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. भाविकांची गैरसोय होऊ



नये यासाठी नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यावेळी पैठण नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे, नगराध्यक्ष विद्याभूषण कासानकर तसेच पैठणचे तहसीलदार यांनी दिंड्यांचे स्वागत केले. नाथषष्ठी निमित्त पैठणमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. नगरपरिषदेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. नाथषष्ठी सोहळ्यानिमित्त पैठणमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविक मोठ्या उत्साहात सहभागी होत आहेत.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान सावेडीच्या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावेडी येथील श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज प्रतिष्ठान आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता परमपूज्य गुरुवर्य जंगले महाराज शास्त्रीजी यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. कीर्तनावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कीर्तनासाठी तुकोबारायांच्या काला प्रकरणातील चार चरणांचा अभंग महाराजांनी सेवेसाठी निवडला होता.

“कंठी धरीला कृष्णमणी । अवघा जनी प्रकाश ।।
काला वाटू एकमेका । वैष्णव आणि का संभ्रम ।।
वाकुलीया ब्रम्हादिका । उत्तम लोका दाखवु ।।
तुका म्हणे भूमंडळी । आम्ही बळी वीर गाढे ।।

या अभंगातून तुकोबाराय काल्याचे अनन्यसाधारण महत्त्व प्रतिपादन करतात. काल्याचे महत्त्व आणि काला कोणाच्या हाताने वाटला जातो हे या अभंगातून स्पष्ट होते. आम्ही कंठात कृष्णमणी धारण केला पण कोणता? ज्याचा संपूर्ण जगतात प्रकाश पडला आहे. अर्थातच तो कृष्णमणी जगाला प्रकाशित करून स्वतः प्रकाश स्वरूप आहे. असा स्वयंप्रकाशित मणी कंठात धारण केला.

असा जो निका वैष्णव आहे, थोडक्यात शुद्ध वैष्णव आहे, त्यालाच काला वाटता येतो व घेता येतो. असा जो भक्ती, ज्ञान आणि वैराग्याच्या सामर्थ्याने युक्त वैष्णव आहे तो ब्रम्हादिकाला वाकुल्या दाखवतो. एवढे सामर्थ्य त्याच्यात आहे व तो या भूमंडळात सर्वात बलवान आहे.

काला प्रसाद प्राप्त होत असताना जे विषयासक्त व बहिर्मुख आहेत त्यांना काला प्राप्त होत नाही. त्यांना फक्त दही आणि लाही मिळेल, पण प्रसाद नाही. असे कोण तर ब्रह्मादिक देव. स्वर्गातील देव यमुनेत मासे म्हणून आले, पण त्यांना काला प्राप्त झाला नाही. पण भक्तीचे, ज्ञानाचे आणि विरक्तीचे असे बळ ज्याच्या अंगात आहे, ज्यांनी अवघ्या जगाला “जगा काळ खाय । आम्ही माथा दिला पाय ।।” असे सांगितले, असे वैष्णवच हा प्रसाद प्राप्त करतात. त्यासाठी पहिला वैष्णव कळला पाहिजे व भगवंतावर कसं प्रेम करावे हे कळले पाहिजे. ज्या माणसाला प्राणीमात्रावर प्रेम करता येते त्यालाच भगवंतावर प्रेम



करता येते.

ज्याच्या अंत:करणात प्रेमाचा पाझर आहे त्यालाच भक्ती करता येते. जे भक्त असतात त्यांना जीवापेक्षा देवच अधिक प्रिय असतो. राधेचा दृष्टांत देऊन सर्व भाविक भारावून गेले.

काल्याच्या कीर्तनाचा विधी, चरित्र तसेच “उच्चारावे केले देवे गोकुळी” भगवान गोपाल कृष्णाचे चरित्र सांगताना भाविकांना प्रत्यक्ष गोकुळाची अनुभूती आली. त्याचबरोबर तुकोबारायांचे अलौकिक सदेह वैकुंठ गमनाचे चरित्र सांगून तुकोबारायांच्या विचारांचा प्रत्येकाने आपल्या जीवनात उपयोग करून तसे आचरण करावे असे प्रतिपादन केले.

“तुका झालासे कळस” म्हणून आपल्या संपूर्ण वारकरी संप्रदायाचे जीवन म्हणजे तुकाराम महाराज आहेत. महाराजांच्या जीवनात अनेक संकटे आली, पण भगवंतावर दृढ विश्वास आणि प्रेम असल्यामुळे तुकोबारायांना सदेह वैकुंठ गमन करता आले. स्वतः भगवंत आपल्या लोकात नेण्यासाठी देहूत आले. हे सामर्थ्य वारकरी संप्रदायाचे व भजनाचे आहे. देवाला भजन अतिशय प्रिय आहे. प्रत्येकाने शुद्ध आचरण ठेवून देवाचे नामस्मरण करावे म्हणजे आपले जीवन समाधानी होईल.

“पुण्य ते परोपकार, पाप ते परपीडा” या संतविचारानुसार प्रत्येकाने जीवन जगताना थोडा तरी परोपकार करावा, असा संदेशही त्यांनी दिला.

कीर्तन झाल्यानंतर महाराजांविषयी बोलताना ह.भ.प. संदीप महाराज खोसे म्हणाले की, सद्गुरूंची सेवा भाग्याने घडते आणि ती भाग्योदय प्राप्त करून देणारी असते. “भाग्याचा उदय ते हे जोडी संत पाय” असे ते म्हणाले. सावेडीकर व अहिल्यानगर पंचक्रोशीचे भाग्य आहे की भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांनी परिपूर्ण असे जीवन असलेले परमपूज्य गुरुवर्य शास्त्री महाराज आपल्याला लाभले आहेत.

# ‘उत्साह आणि श्रद्धा हीच आपल्या परंपरेची ताकद!’ : उद्योजक मंगेश दाते



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** निघोज गावातील ढवणवाडी येथील श्री चैतन्य कानिफनाथ महाराज ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त मढी येथून पवित्र ज्योत आणण्यासाठी निघालेल्या शेकडो भाविक कार्यकर्त्यांचा पारनेर शहरातील आमदार काशिनाथ दाते सर जनसंपर्क कार्यालयात सन्मान करण्यात आला.

पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात आमदार दाते सरांच्या वतीने उद्योजक मंगेश काशिनाथ दाते यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचा सत्कार करून पुढील धार्मिक वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा देत यथोचित सन्मान केला. यावेळी उद्योजक राजेंद्र औटी, सुनिल गाडगे, कार्याध्यक्ष रमेश वरखडे, वसंत ढवन, मच्छिंद्र लाळगे, संकेत ढवण, वेदांत ढवण, सुदाम ढवण, शंकर ढवण, दिपक ढवण, संदीप ढवण, दिलीप वरखडे, गणेश ढवण, युवराज ढवण, निखील ढवण, शुभम ढवण, संतोष ढवण, अमोल एरंडे, विष्णु ढवण, विनायक ढवण, नवनाथ ढवण, सुनिल ढवण, संपत ढवण, आदिनाथ ढवण, शंकर ढवण, राजू ढवण, वसंत ढवण, किरण वरखडे, तुषार ढवण, सोमनाथ ढवण, तुषार घुले, आकाश चव्हाण, प्रविण कोठावळे, मंगेश ढवण, भास्कर ढवण, आकाश ढवण यांसह श्री चैतन्य कानिफनाथ महाराज ट्रस्ट ढवनवाडीचे शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंगेश दाते म्हणाले, निघोज आणि धार्मिकतेचे एक अतूट नाते असून माता मळगंगेची पावन भूमी असलेल्या निघोज नगरीतील ढवनवाडीच्या चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या यात्रेला आणि या परंपरेला परिसरातील भाविकांमध्ये मोठे आध्यात्मिक महत्त्व आहे. वर्षानुवर्ष हि अनमोल धार्मिक परंपरा जपण्यासाठी कार्य करणाऱ्या मंडळांच्या कार्यकर्त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळातही या ट्रस्ट व मंडळाच्या सर्व उपक्रमांना आमदार काशिनाथ दाते सरांच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. निघोज येथील ढवणवाडीमध्ये आयोजित चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सव धार्मिक वातावरणात साजरा होत असून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मढी येथे जाऊन ज्योत आणण्याच्या या पारंपरिक सोहळ्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आमदार काशिनाथ दाते यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या स्वागतामुळे भाविकांचा उत्साह अधिक वाढल्याचे त्यांनी सांगितले.

# खाद्यतेल दरवाढीने गृहिणींचे गणित बिघडले; किचनचे बजेट कोलमडले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून खाद्यतेलाच्या दरात सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या घरगुती खर्चावर होत आहे. सूर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेलाच्या किंमती वाढल्याने गृहिणींचे मासिक किचन बजेट कोलमडले आहे.

बाजारातील घडामोडीनुसार आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढ, आयातीवरील खर्च आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे खाद्यतेलाच्या किंमतींमध्ये वाढ झाली आहे. परिणामी किरकोळ बाजारात तेलाच्या दरात प्रति लिटर १५ ते २० रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

सध्या अनेक शहरांमध्ये सूर्यफूल तेलाचे दर प्रति लिटर १८० ते २०० रुपयांच्या घरात पोहोचले आहेत. सोयाबीन व पाम तेलाच्या किंमतीतही लक्षणीय वाढ झाली असून याचा फटका सर्वसामान्य ग्राहकांना बसत आहे.

दरवाढीमुळे अनेक कुटुंबांनी तेलाचा वापर कमी करण्यास सुरुवात केली असून स्वयंपाकातील खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी गृहिणींना कसरत करावी लागत आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारातील स्थिती स्थिर झाल्यास आगामी काळात खाद्यतेलाच्या किंमतीत काही प्रमाणात घट होण्याची शक्यता व्यापारी वर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

# फिनिक्स मार्केटसिटी विमाननगरमध्ये पुण्यातील सर्वात मोठा ॲनथलीजर आणि स्पोर्ट्सवियर झोन सादर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पुणे–** फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे, कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात. फिनिक्स मार्केटसिटीने या झोनच्या माध्यमातून पुण्यातील वाढती फिटनेस संस्कृती आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन एक खास स्पोर्ट्स आणि ॲथलीजर झोन तयार केला आहे.

हा नवीन झोन पुण्यात होत असलेला बदल दाखवतो. आता अनेक लोकांसाठी ट्रेनिंग ही रोजची सवय बनली आहे. रनिंग कम्युनिटी वेगाने वाढत आहेत. ॲरथलीजर आता फक्त खेळापुरता मर्यादित नसून तो दैनंदिन स्टाइलचा भाग बनला आहे. फिनिक्स मार्केटसिटीने या बदलांना प्रतिसाद देत एक नवीन झोन तयार केला आहे. येथे ग्राहक प्रीमियम आणि आकर्षक स्टोअर्समध्ये खरेदीचा आनंद घेऊ शकतात, तसेच पुण्यात पहिल्यांदाच सादर केली जाणारी उत्पादने पाहू शकतात.

याबद्दल बोलतांना, श्री अंशुमन भारद्वाज, सिनिअर सेंटर डायरेक्टर, फिनिक्स मॉल्स पुणे म्हणाले, “फिनिक्स मार्केटसिटी पुणे नेहमीच असे अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करत असते जे शहरासाठी




उपयुक्त आणि महत्त्वाचे आहेत. स्पोर्ट्स आणि ॲरथलीजर झोन हा त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. प्रमुख स्टोअर्स एका ठिकाणी एकत्र आल्यामुळे, आम्ही खेळांमध्ये रस असलेल्या खरेदीदारांसाठी तसेच ज्यांच्यासाठी ॲथलीजर दैनंदिन पोशाखाचा भाग आहे त्यांच्यासाठी एक उत्तम ठिकाण तयार केले आहे.“

नाइकी हा या झोनमधील मुख्य आकर्षण आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या स्टोअर्सपैकी एक असून पुण्यातील एकमेव फ्लॅगशिप स्टोअर आहे. स्टोअर प्रीमियम डिझाइनसह तयार केलेले असून जागतिक दर्जाचा आकर्षक अनुभव देते. या स्टोअरमध्ये नाइकीच्या प्रसिद्ध कॅटेगरीज जसे की जॉर्डन, एअर फोर्स १ आणि डंक्स उपलब्ध आहेत. तसेच परफॉर्मन्स, लाइफस्टाइल, रनिंग आणि ट्रेनिंगसाठी आवश्यक वस्तूंचे निवडक कलेक्शनही येथे आहे. या कलेक्शनमध्ये नाइकीची नवीन उत्पादने समाविष्ट आहेत त्यामुळे ग्राहकांना एकाच ठिकाणी प्रमुख आणि नवीन कलेक्शन सहज मिळतात.

ऑडिडासने आपले नवीन फ्लॅगशिप स्टोअर सुरू केले आहे, जे ब्रँडच्या जागतिक डिझाइनची झलक दाखवते. या लॉन्चमध्ये शू वर लक्ष केंद्रीत केले गेले आहे. हा शू आरामदायी हालचाली (“एफर्टलेस मूव्हज“) आणि स्टायलिश दिसण्यासाठी (“ एंडलेस लूक“) साठी डिझाइन केलेला आहे. रोजच्या वापरासाठी आणि शहरातील वेगवान जीवनशैलीसाठी हा शू उत्तम आहे, कारण तो आराम आणि स्टाइल दोन्ही देतो.

असिक्सने फ्लॅगशिप स्टोअर सुरू करून या झोनमध्ये रनिंगवर विशेष भर दिला आहे. या स्टोअरमध्ये खास जीईएल निंबस २८ शू आहे, ज्यात क्लाउडसारखा आराम देणारी एफएफ ब्लास्ट प्लस कुशनिंग, शॉक ऍब्झॉर्प्शनसाठी प्युअरजेल, उत्तम फिट आणि आरामासाठी इंजिनिअर्ड निट अप्पर आणि चांगली पकड देण्यासाठी हायब्रिड असिक्स ग्रिप आउटसोल आहे. हा स्टोअर असिक्सला अशा धावपटूसाठी एक विश्वासार्ह




आणि खास ठिकाण बनवतो, जे आराम आणि विश्वसनीय परफॉर्मन्स शोधत आहेत.

याचबरोबर, स्केचर्सने आपले फ्लॅगशिप स्टोअर उघडून या झोनमध्ये आपली उपस्थिती वाढवली आहे. येथे रोजच्या वापरासाठी आरामदायक आणि सहज हालचालीसाठी अनेक चांगले पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे ॲथलीजर कॅटेगरी आणखी मजबूत झाली आहे.

फिनिक्स मार्केटसिटी पुणे बद्दल

फिनिक्स मार्केटसिटी पुणे हे शहरातील प्रीमियम लाइफस्टाइल ठिकाण आहे. येथे तुम्हाला भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सची खरेदी करता येते, स्वादिष्ट जेवणाचा आनंद घेता येतो, तसेच तसेच वैविध्यपूर्ण मनोरंजनचा अनुभव घेता येतो. ह्यामुळे हे पुण्यातील लोकांमध्ये सर्वात आवडते ठिकाण बनले आहे.

# केडगाव-दौंड रोड परिसराला जोडणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गाचे लोकार्पण

## वाढत्या शहरीकरणाबरोबर रोजगाराचा प्रश्न निर्माण – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव-दौंड रोड परिसराला जोडणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गाचे लोकार्पण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. माजी सभापती मनोज कोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा मार्ग साकार झाला असून आता या परिसरातील नागरिकांना वाहतुकीसाठी कायमस्वरूपी जवळचा मार्ग उपलब्ध झाला आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील युवक मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी शहराकडे येत आहेत. त्यामुळे वाढत्या शहरीकरणाबरोबरच रोजगाराचा प्रश्न निर्माण होत आहे. शहरांमध्ये झोपडपट्ट्या निर्माण होऊ नयेत यासाठी युवकांच्या हाताला काम देणे गरजेचे असून औद्योगिक वसाहती वाढविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

केडगाव उपनगरातील नागरिकांनी युतीचे १२ नगरसेवक निवडून दिले असून या भागाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले. केडगाव येथील देवी मैदानाचे लवकरच काँक्रिटीकरण करण्यात येणार असून शहरालगत वाहणाऱ्या सीना नदीचे सौंदर्यीकरण जलसंपदा विभागाच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आमदार संग्राम जगताप यांनी शहर विकासासाठी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे शहरात रस्त्यांचे जाळे उभे राहिले आहे. अनेक वर्षांनंतर केडगावमध्ये येताना सर्वत्र काँक्रिटीकरण झालेले रस्ते पाहायला मिळत आहेत, असेही विखे पाटील म्हणाले. खाजगी शिकवणी क्लासच्या वाढत्या फीमुळे सर्वसामान्य कुटुंबांची आर्थिक परिस्थिती डळमळीत होत असून या फी वाढीला विरोध करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कोमल कोतकर, अश्विनी लोंढे, माजी नगरसेवक सुनील मामा कोतकर, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, अमोल येवले, विजय पठारे, सुरज कोतकर, महेंद्र कांबळे, अजित कोतकर आदींसह अनेक नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी शहरालगत बायपासची निर्मिती केली, तर शहरात रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याची अनेक कामे मार्गी लावण्यात आली आहेत. पूर्वी शहरात विकासकामांचा अभाव होता, त्यामुळे मूलभूत प्रश्नांपासून कामे सुरू करावी लागली. नागरिकांचा प्रवास सुरक्षित व सुलभ व्हावा यासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. शहरातील चौकांमध्ये मुंबईच्या धर्तीवर सिग्नल बसविण्याचे काम सुरू असून महामार्गांवर पथदिवे बसवले जात आहेत. तसेच शहरात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यामुळे गुन्हेगारांवर वचक निर्माण झाला असून पोलिसांना गुन्हेगार शोधण्यात मदत होत आहे.

माजी सभापती मनोज कोतकर म्हणाले की, केडगाव व दौंड रोड परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी कायनेटिक चौक व पुणे महामार्गाचा मार्ग वापरावा लागत होता. हा मार्ग लांब असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. तसेच शाळकरी विद्यार्थ्यांनाही या मार्गावरूनच जावे लागत असल्यामुळे अपघाताची शक्यता होती. नागरिकांचा सुरक्षित व जवळचा प्रवास व्हावा यासाठी रेल्वे भुयारी मार्गाची मागणी करण्यात आली होती. यासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर केंद्र सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाल्यामुळे हा मार्ग साकार झाला. सुजय विखे हे आमच्या मनातील खासदार असून केडगाव परिसराच्या विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आणखी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. तसेच केडगावचे ग्रामदैवत रेणुका माता मंदिराजवळील मोकळ्या जागेचा वापर यात्रेसाठी केला जातो. पावसाळ्यात येथे भक्तांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या ठिकाणच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले, तर आभार प्रदर्शन नगरसेवक मयूर बांगरे यांनी मानले.

# डीएसपी व प्रेमदान चौकातील आधुनिक सिग्नलचे लोकार्पण

## पालकमंत्री राधाकृष्ण विखें पाटील यांच्या हस्ते सोहळा संपन्न | सिग्नलमुळे सुरक्षित प्रवास व वाहतुकीला शिस्त लागणार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील प्रमुख चौकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे सिग्नल बसविण्याचे काम जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुरू असून डीएसपी व प्रेमदान चौक येथील नव्याने उभारण्यात आलेल्या सिग्नलचे लोकार्पण पालकमंत्री राधाकृष्ण विखें पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रमुख चौकांमध्ये सिग्नल बसविण्यात येत आहेत. या सिग्नलच्या माध्यमातून नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होईल तसेच वाहतुकीला शिस्त लागण्यास मदत होईल. त्यामुळे चौका-चौकांमध्ये वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण कमी होईल. मात्र नागरिकांनीही वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवसेंदिवस शहरात वाहतुकीची समस्या वाढत असून प्रशासन त्याचे नियोजन करत आहे. नागरिकांनी प्रवास करताना वाहतूक नियमांचे पालन करावे, जेणेकरून आपला जीव सुरक्षित राहील, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार संग्राम जगताप शहर विकासासाठी जिल्हा नियोजन समितीकडे सातत्याने पाठपुरावा करत असून त्यातून शहरासाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. अहिल्यानगर शहर विकसित शहर म्हणून ओळखले जाऊ लागले असून त्या दृष्टीने विकासकामांचे नियोजन केले जात असल्याचेही पालकमंत्र्यांनी नमूद केले. ड वर्ग महापालिकांमध्ये अहिल्यानगर शहर राज्यात प्रथम क्रमांकावर यावे, यासाठी स्मार्ट सिटीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश देत त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील डीएसपी व प्रेमदान चौक येथे उभारण्यात आलेल्या या सिग्नलच्या लोकार्पण सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेवक निखिल वारे, करण कराळे, दत्ता गाडळकर, महेश लोंढे, अभिजीत बोरुडे, रोहन सानप आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून शहर विकासासाठी जिल्हा नियोजन समितीमधून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. शहरातील स्ट्रीट लाईट, प्रमुख चौकांमधील सिग्नल तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. डीएसपी व प्रेमदान चौक येथे मुंबईच्या धर्तीवर बसविण्यात आलेल्या सिग्नलमुळे वाहतुकीला शिस्त लागेल तसेच चौकांमधील वाहतूक कोंडी टळण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

# 'गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी वीजेचा नवा दीप'– उद्योजक दिलीप दाते

## ना. विखे, आ. दाते यांचे नेतृत्वात विकासाकडे वाटचाल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** नवनागापूर परिसरातील वाढत्या वीज मागणीचा विचार करून मंजूर करण्यात आलेल्या पाच नवीन विद्युत रोहित्र () कामांचे उद्घाटन पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर हे अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ निमित्त मुंबई येथे व्यस्त असल्याने त्यांच्या वतीने उद्योजक दिलीप दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी उद्योजक दाते यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांना शेती, माती आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव असल्यामुळेच संपूर्ण मतदारसंघात सर्वसमावेशक विकासाचा समतोल साधणे शक्य होत आहे.

यावेळी अप्पासाहेब (बंडूनाना) सप्रे, संजय भोर, नरेश शेळके, संतोष रोकडे, दत्ताभाऊ चौरे, रामदास अडसूरे, अशोक रासकर, राजू शिंदे, राहुल सप्रे, रवींद्र सप्रे, शंकर पवार, सुयोग घोलप रमेश शेवाळे,संजय खाडे, किशोर खाडे, बाळासाहेब खरमाळे,साबळे साईनाथ, विकास लोखंडे, बबनराव गुडगळ,विपुल भोसले, नीलकंठ उल्हारे, नितीन खंडारे,निखिल शिंदे, प्रतिक कवडे, ऋषिकेश वाघ,गरकळ मामा,रावसाहेब वैरागर, गणेश नाईकनवरे, राजू चोरगे, लहू कुचेकर, विजय आवारे, अप्पासाहेब शिदोरे, किरण वीर, रामदास पालवे, अनिल साबळे, विलास घुले, प्रविण सुपेकर, आकाश कोल्हाळ, आकाश पवार,पोटोळे भाऊ, अंकूश थिटे, नाना खराडे, उमेश साळवे, नानासाहेब भणगे, तुषार गायकवाड,वैभव गायकवाड, प्रतीक म्हसे, अन्वर शेख, रमेश पालवे, नवनाथ घोरपडे, रविराज चौगुले, नितीन धोंडगे, कैलास लेंडाळ, सुजित वैद्य, मगर मामा, श्रीकांत खाडे, भाऊ पाळंदे, विकास शिंदे, श्रीकांत पवार, शरद गाढे, बाबासाहेब साठे, संजय कुलकर्णी, चंद्रकांत मुस्कवाड, बाबासाहेब साबळे, रोहित माने, संकेत ताडगडकर, रामदास जाधव, ओंकार साबळे, तेजस मिसाळ, आशिष साळवे, प्रदोष सांगळे ,महादेव पठारे, अनिल गिरी, मंथन राऊत, बाबासाहेब शिंदे,अशोक पुंड, अनिल पंडीत, राजूभाऊ क्षीरसागर, तापकीरे मामा, नितीन पवार, सुरेश पवार, गोकुळ म्हसे, गणेश चव्हाण, पांडे भैय्या, वीर माजी सैनिक संघटना सर्व पदाधिकारी, विशाल क्षीरसागर,भारत मनतोडें, चंद्रकांत मावळकर, प्रविण सुरानकर, सोमनाथ आढाव,संदिप जमदाडे, पोपट गायकवाड, अमोल सीतापुरे, सुरेश मुळे, शैलेश माघाडे, आनंद जाधव, संजय अंकुश, रतन गिते, देविदास शिंदे, सचिन बडे, जालिंदर खाडे, नंदकुमार भालेकर, राजन कोल्हे,भारत कोरडे, रमेश डुचे, दत्तात्रय झिने, बाबासाहेब निक्रड, विनायक नांगरे, शुभम घाडगे, शिवाजी खोसे,सरडे मेजर, तात्यासाहेब रूपनवर, अप्पासाहेब खोसे,जयंत थोरात, महेश कव्हाळे, कैलास म्हस्के, बन्शी काळे, लॅक्सिमीलाल शर्मा, रेणुकाताई पुंड,सोनालीताई चौरे,पवार ताई,कुलकर्णी ताई, आर्या भाभी, सुरंगे ताई, पुष्पा एकशिंगे, उषा दुधाडे, अंजली मंचरे, वैशाली मावळकर, मयुरी डागवाले, शुभांगी सोनार, सुरेखा पवार, वाबळे ताई, भालेराव ताई, आढाव ताई,सपना रासकर, शिंदे ताई, आशा सांगळे,सय्यद भाभी, गिते ताई,बाचकर ताई, सुमन कोल्हाळ, वैशाली नांगरे, जयश्री बडे, हेमा साळुंखे, जयश्री डुचे, रंजना निक्रड, कदम ताई आदी मान्यवर व स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे दाते म्हणाले, मा. युवा खासदार सुजय विखे पाटील यांना संपूर्ण मतदारसंघातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीची अचूक जाण आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावातील प्रश्न आणि गरजा यांची त्यांना सखोल माहिती असल्यामुळे विकासकामांना योग्य दिशा मिळत असून नवनागापूर परिसरातील वाढत्या वीज मागणीचा विचार करून मंजूर करण्यात आलेल्या पाच नवीन विद्युत रोहित्रांचे आज होत असलेले लोकार्पण हा या सर्व नेतृत्वांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाच्या फालश्रुतीचाच एक भाग आहे.

मोहिनीनगर येथील श्री हनुमान चौक, छत्रपतीनगर दांगट मळा येथील श्री शनिमंदिर परिसर, वकर्तुंड कॉलनी पाणी टाकी जवळ, आंधळे-चौरेनगर साईविश्व कॉलनी येथील साईबाबा मंदिर परिसर तसेच मनोरमा कॉलनी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या विद्युत रोहित्रांमुळे परिसरातील वीज पुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असल्याचे सांगत या नवीन विद्युत रोहित्रांमुळे यापुढे नागरिकांना अखंडित आणि उच्च दर्जाचा वीजपुरवठा मिळणार असून यामुळे व्होल्टेज कमी-जास्त होण्याची समस्या दूर होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# खडकवाडीत ७/१२ नसताना ११ जणांना पीएम किसानचे अनुदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथे काही लाभार्थ्यांच्या नावावर शेतीची जमीन अथवा सातबारा (७/१२) नोंद नसतानाही शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत अनुदान दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तक्रारीनंतर झालेल्या चौकशीत तब्बल ११ लाभार्थ्यांच्या नावावर जमीन नोंद नसतानाही त्यांना अनुदान वितरित झाल्याचे स्पष्ट झाले असून या प्रकारामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. खडकवाडी येथील माजी उपसरपंच अक्षय बाबाजी ढोकळे यांनी याबाबत शासन दरबारी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कृषी विभागाकडून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान काही लाभार्थ्यांच्या नावावर शेती अथवा ७/१२ उतारा नसतानाही त्यांना योजनेचा लाभ देण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथे २०२० ते २०२२ या कालावधीत ११ बोगस लाभार्थ्यांच्या नावावर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत अनुदान देण्यात आले. संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात शासनाकडून रक्कम जमा झाल्याची माहितीही पुढे आली आहे.

या प्रकरणाची चौकशी सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित ११ लाभार्थ्यांच्या नावावर सातबारा उतारा नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

याबाबत तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी सांगितले की, सातबारा नसलेल्या व्यक्तींना अनुदान देणे नियमबाह्य आहे. तक्रारीनंतर चौकशी करून त्याचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात आला असून पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीत होणाऱ्या त्रुटी आणि अनागोंदी कारभार पुन्हा एकदा समोर आला असून तालुक्यात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

# स्मार्ट सुगृहिणी स्पर्धेत चेतना मुथियान प्रथम; महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रम रंगला

## खेळ पैठणीचा स्पर्धेने रंगली महिला दिनाची संध्याकाळ; प्रनोती हळगावकर विजेती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त स्मार्ट सुगृहिणी स्पर्धा व होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. संस्थेतील महिला सभासद व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध मनोरंजक व कौशल्याधारित स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धांमध्ये ठिपक्यांची रांगोळी, सामान्य ज्ञान, सलाड डेकोरेशन, घरगुती अडथळे शर्यत, नोटांची नवलाई आणि फिटनेस फेरी अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. तसेच होम मिनिस्टर अंतर्गत प्रसिद्ध सादरकर्ते चेतन गायकवाड यांनी 'खेळ पैठणीचा' ही स्पर्धा घेतली. या कार्यक्रमात ५० हून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

रांगोळी स्पर्धेत गुंजन गुंदेचा यांनी प्रथम तर प्रिया कुलकर्णी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. सामान्य ज्ञान स्पर्धेत ऐश्वर्या देवी प्रथम आणि भारती मुथियान द्वितीय ठरल्या. सलाड सजावट स्पर्धेत रेणुका उजनीमठ प्रथम तर भाग्यश्री जहागीरदार द्वितीय आल्या. घरगुती अडथळे शर्यतीत रुपाली देवी प्रथम आणि वीणा सभारंजक द्वितीय ठरल्या. फिटनेस फेरीमध्ये अनुजा खांडेकर प्रथम तर भारती खांडेकर द्वितीय ठरल्या. नोटांची नवलाई स्पर्धेत मैथिली बेरड यांनी प्रथम तर चेतना मुथियान यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

स्मार्ट सुगृहिणी मुख्य स्पर्धेत चेतना आशिष मुथियान यांनी प्रथम क्रमांक मिळवत एरेक्शा एअर चिमणी हे बक्षीस मिळविले. गुंजन अमित गुंदेचा यांनी द्वितीय क्रमांक मिळवत एरेक्शा एअर फ्रायर तर मैथिली बेरड यांनी तृतीय क्रमांक मिळवत एरेक्शा इंडक्शन टॉप हे बक्षीस मिळविले. या स्पर्धेचे परीक्षण हर्षदा डोळसे (संचालक, अशोका आर्ट गॅलरी व अशोका आर्ट इन्स्टिट्यूट) यांनी केले.

यानंतर झालेल्या 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' या स्पर्धेत विविध मनोरंजक खेळ, मराठी गाण्यांवर नृत्य, उखाणे, भक्तीगीत व संगीत स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत प्रनोती अनिकेत हळगावकर यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाची पैठणी जिंकली. मीना अनिल आठरे द्वितीय, मैथिली दादासाहेब बेरड तृतीय तर जयश्री जयप्रकाश विधाते चौथ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांना अनुक्रमे गजांत लक्ष्मी, नेकलेस व सोन्याची नथ अशी बक्षिसे देण्यात आली. पूनम विशाल येसेकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमासाठी एसआरजे स्टील हे प्लॅटिनम प्रायोजक होते. राघवेंद्र सप्लायर्स प्रा. लि. आणि श्री वेंकटेश्वरा आरएमसी अँड सप्लायर्स हे गोल्डन प्रायोजक तर विविध कंपन्यांनी सिल्वर प्रायोजक म्हणून सहकार्य केले.

संस्थेचे अध्यक्ष अभिजीत देवी यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, प्रत्येक यशस्वी व्यक्तीमागे स्त्रीचा मोठा वाटा असतो. सिव्हिल इंजिनिअर किंवा आर्किटेक्टचे काम करताना घरातील सर्व जबाबदाऱ्या सांभाळत कुटुंबाला आधार देणाऱ्या गृहिणींचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम प्रथमच राबविण्यात आला.

या कार्यक्रमास संस्था उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव तसेच सुनिल औटी, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, जितेश सचदेव, सचिन डागा, सुनिल जाधव, संकेत पादिर, अनमोल जैन, गौरव मांडगे यांच्यासह संस्थेचे सभासद व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एसा लेडीज विंगच्या प्रमुख वैशाखी हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सचदेव, वर्षा कुसळकर, कोमल कुलकर्णी, निकिता बालटे आणि प्रणाली तांदळे यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.